## साहित्यिकांच्या सहचारिणी

कलावंताबद्दल – आणि त्यातल्या त्यात साहित्यिकांबद्दल- समाजाच्या मनात एक आगळेच प्रेम असते. त्या प्रेमापोटीच त्यांचा स्वभाव, आवडीनिवडी, त्याचे वैयक्तिक आणि कौटुंबिक जीवन जाणून घेण्याची त्याला उत्सुकता वाटते. अशांच्या सहचारिणीबद्दल कोणी काही बोलू-सांगू लागले म्हणजे तर समाजाचे कुतुहल आणखीनच तीव्र होते. कारण कलावंत म्हटला, साहित्यिक म्हटला की आपल्या डोळ्यापुढे उभा राहतो एक संवेदनाशील जीव, स्वतःच निर्माण केलेल्या भावोत्कट, स्वप्नील, तरल जगात वावरणारा आणि स्वतःच्या 'अस्मिते'ला सदैव जपणारा असा. त्यांचे भावविश्व आणि त्यात उमटणारे नानाविध रंग-तरंग जाणून घ्यावे आणि त्याला आयुष्यभर साथ देत रहायचे हे काम काय सोपे थोडेच आहे?.

'बालकवीं'च्या पत्नी श्रीमती पार्वतीबाई ठोंबरे यांनी आपल्या आत्मकथेत 'बालकवी' बद्दल जे लिहिले आहे ते वाचल्यावर माझ्या मनात आले, आजवर आपल्याला माहीत होते ते 'फुलराणी', निर्झरास', अशा चिरसुंदर, सुकुमार कविता लिहिणारे कोमल मनाचे 'बालकवी' पण त्यांच्या मनाला, आपला कधी विश्वासही बसणार नाही असा एक उग्र-कठोर कप्पा होता की ज्याची झळ फक्त त्यांच्या निरागस पत्नीलाच सोसावी लागली. या पुस्तकाने आपल्याला हे एक नवेच दर्शन घडविले आणि मग स्वाभाविकच पार्वतीबाईबद्दल वाटणाऱ्या अनुकंपेने माझे मन भरुन आले.

'बालकवीं'च्या सहचारिणीचा जसा या पुस्तकाने मला परिचय झाला तसाच आणखी काही साहित्यिकांच्या सहचारिणींचा परिचय त्या आपल्या पतिराजांबरोबर आमच्या किर्लोस्करवाडीला कारखाना पहायला आल्या, मासिकांच्या समारंभासाठी आल्या या किंवा अशाच काही कारणांनी झाला. त्यातल्या काहीजणींच्या जीवनाची ही लहान-मोठी इंद्रधनुष्ये !!

कालच्या नऊ 'मे' ला आमच्या माई कानेटकर म्हणजे कवी 'गिरीशां'च्या पत्नी, वयाच्या ८६ व्या वर्षी कालवश झाल्या. एकोणीसशे बेचाळीस साली 'विलिंग्डन' महाविद्यालयात पहिल्या वर्षात मी नाव दाखल केले. तेव्हापासून म्हणजे नाही म्हटले तरी चाळीस वर्षापेक्षा अधिक काळ मी माईंना पहात होते. सुमारे पाऊणशे वर्षापूर्वी एका शिक्षकाची, तेही कवी असलेल्या शिक्षकाची सहचारिणी म्हणून माईनी 'कानेटकरां'च्या घरात प्रवेश केला. या मंडळीचे राहणे 'रहिमतपूर' सारख्या आडगावात. एकत्र कुटुंब, त्याचे खटलेही मोठे! शाळेच्या शिक्षकाची मिळकत ती कितीशी असणार? त्यातच घरातल्या कर्त्या पुरुषाची जबाबदारीही 'गिरीशां'वरच. ते रहिमतपूरला राहोत नाहीतर पुण्याला किंवा सांगलीला राहोत. साहित्यप्रेमी मंडळींची त्यांच्या घरी सततच ये-जा असायची. काव्यशास्त्रविनोदाच्या मैफली घडायच्या. त्या मैफलीत माईंनी भाग किती घेतला याची मला कल्पना नाही. पण अशा मैफलींचा आनंद घेण्या इतकी रसिकता आणि आपल्या पतीच्या वा त्यांच्या स्नेह्या-सोबत्यांच्या कलाकृतींचे मर्म जाणण्याची जाणकारी निःसंशय त्यांच्या ठिकाणी असावी. कारण म्हणूनच ना प्रसिध्द नाटककार असलेले माईंचे चिरंजीव म्हणतात की, "माईला वाचून दाखविल्याशिवाय माझे नाटक पूर्ण झाले आहे असे मला वाटतच नाही" कवी गिरीशांचीही भावना हीच होती.

माईंना केवळ साहित्याचेच प्रेम होते असे नाही तर साहित्यिकांविषयीही त्यांना अशीच आपुलकी होती. साहित्यिकाचे लहान-मोठेपण, माणूस म्हणून त्याच्या स्वभावात असलेले भलेबुरेपण जाणण्याची एक उपजतच कसबी दृष्टी आणि आर्द्रबुध्दी माईंजवळ होती. सुमारे पन्नास वर्षापूर्वी सुप्रसिध्द कवी 'माधव जुलियन' यांना पुण्यात रहायला चांगल्या वस्तीत घर मिळणे दुरापस्त झाले होते. पुणेकर व त्यांची पुणेरी वृत्ती यांनी माधवरावांची जणू ससेहोलपटाच चालविली होती. रसिक आणि तरुण मनाला भूल पडेल अशी सुरेख प्रेमकाव्ये ते लिहीत हा त्यांचा अपराध होता. हळवे माधवराव त्यामुळे स्वाभाविकच कष्टी होते. त्यावेळी माई व गिरीश एखाद्या पहाडासारखे त्यांच्या पाठीशी उभे राहिले. माईंची ही कामगिरी लहानसहान नव्हे.

तीर्थरुप भाऊसाहेब खांडेकर मला म्हणत. "मालूताई, माईंच्या पंच्याहत्तरीचा समारंभ तुम्ही सांगलीकर मंडळीनी थाटात करायला हवा. मी त्या समारंभाला अध्यक्ष म्हणून नक्की येईन." अशा गौरवोद्गारांपेक्षा अधिक चांगले प्रशस्तिपत्रक कशाला हवे?

१९२५ ते ३५ हा काळ म्हणजे रविकिरण मंडळाच्या ऐन बहराचा आणि बहारीचा काळ ! त्या काळासंबंधी, तो काळ पाहिलेली मंडळी बोलू लागली की, त्यांच्या बोलण्यालिहिण्यात माईंचा उल्लेख आवर्जून येतोच! गिरीशांना पंचाहत्तर वर्षे पुरी झाली म्हणून त्यांचा आणि कवी यशवंतांचा, सांगलीच्या कलाप्रेमी राजदंपतीने व सांगली नगरीने मोठा थाटाचा सत्कार केला. त्या दिवशी गिरीश सर, सर्व जामानिमा करुन समारंभाच्या ठिकाणी जायला निघणार एवढ्यात माईंनी त्यांना आत बोलावले, त्यांच्या कपाळी कुंकू लावले, त्यांना देवाला नमस्कार करायला सांगून त्यांच्या हातावर पेढा ठेवला. नंतर आपणही देवाला नमस्कार करुन हळदी-कुंकू वाहिले आणि मग त्यांनी सरांना मोटारीशी आणून मार्गस्थ केले! सरांचे नावच केवळ 'शंकर' नव्हते तर त्यांचा शीघ्रकोपीपणाही त्यांच्याजवळ होता. त्यांच्या वृध्द, सोवळ्या आईचाही स्वभाव तसाच! सुमारे पस्तीस चाळीस वर्षापूर्वी विश्रामबागेत रहाणाऱ्या साऱ्या लोकांना भाजीपाल्यापासून सगळ्या वस्तू सांगलीतूनच आणायला लागायच्या. माई दुपारी घरातल्या सगळ्यांचे चहा-पाणी आटोपून अशाच काही खरेदीसाठी गावात निघाल्या की त्यांच्या सासूबाईंनी म्हणावे. "बघा-बघा. कशी निघाली आहे कॉलेजच्या पोरीसारखी!" माईंना नातवंडे झालेल्या वयातली गोष्ट आहे ही. माईंचे याच्यावर उत्तर म्हणजे त्यांचे मौन. सरांची शिस्त तशी कडकच. अकराला पाने बसायला हवीत जेवणाची म्हणजे हवीतच. घरात त्या वेळी जेवायला त्यांची स्वतःची मुले-नातवंडे, इतर आप्तांची घरातच शिकायला राहिलेली मुले-मुली, आणि शाळा-कॉलेजात जाणाऱ्या सुनाही असत. (आपल्या काळाच्या पद्धतीप्रमाणे आपल्याला जास्त शिकायची संधी मिळाली नाही पण आपल्या सुनांना ती मिळावी ही माईंची धडपड असे.) त्यातच वाराने जेवायला येणारे विद्यार्थीही असत. त्यांचीही पान वेळेतच बसली पाहिजेत. हा सरांचा कटाक्ष. पण हा सगळा व्याप माईंनी अतिशय शांतपणे, खबरदारीने सांभाळला. माईंचे मोठे चिरंजीव मधुकरराव आकाशवाणीत अधिकारीपदावर. त्यांच्या सतत बदल्या होत. म्हणून नातवंडेही माईंनीच वाढवली. आजोबा नि नातवंडे यांच्यातला सेतू म्हणजेही माईच! माईंच्या या साऱ्या कर्तृत्वाबद्दल त्यांची कोणी प्रशंसा करु लागले, की माई फक्त मंदसे हसायच्या. त्या हसण्याचा अर्थ असे "अहो, मी काय विशेष असं केलंय प्रापंचिक, गृहिणीची हीच कर्तव्ये नाहीत का?" माझ्या मनात येई त्यांना सांगावे, "माई, माणसाने त्याचे कर्तव्य केल्याबद्दलच त्याचा सत्कार करायचे दिवस आले आहेत आता."

घरच्या गृहिणीवर कधी कधी एखादा महत्त्वाचा निर्णय स्वतःच्या जबाबदारीवर घेण्याचा प्रसंग येतो. माईंचा धकटा मुलगा 'शरद' लहान असताना त्याला कानाचे काही दुखणे झाले. सर परगावी गेलेले आणि डॉक्टरांचे मत "ताबडतोब ऑपरेशन करायला हवे" असे! माईंनी सांगितले, "करा ऑपरेशन." एकदा अडचणीच्या प्रसंगी हातातल्या पाटल्या काढून त्यांनी सरांना दिल्या. माईंच्यामधली ही कर्तव्यतत्परता य. गो. जोशी यांनी आपल्या 'माई' या कथेत यथातथ्यपणे उभी केली आहे.

सरांच्या शेवटच्या आजाराचे स्वरुप केवळ हृद्रोगाचेच नव्हते तर काहीसे विचित्रही होते. मनातला विचार शब्दांनी बोलून दाखविण्याच्या त्यांच्या शक्तीवरच सावट आले होते. त्यामुळे पंधरापंधरा दिवसांत ते एक शब्दही बोलत नसत. माईंनी त्यांची आलोचन सेवा केली. सर एक दिवस डॉक्टरांना म्हणाले. "तुम्ही माझे ऑपरेशन करणार असलात तर त्यालादेखील माझी तयारी आहे. माईला माझे फार करावे लागते. तिचे कष्ट मला पहावत नाहीत हो." त्यांच्या ठिकाणी असलेल्या या कर्तव्यनिष्ठेने भारावून जाऊनच, परवा त्यांना श्रध्दांजली वाहताना वसंतरावांच्या पत्नी सिंधुताई म्हणाल्या. "माई माझ्या केवळ सासूबाईच नव्हत्या. त्या माझ्या मार्गदर्शक शिक्षिका होत्या. माझी मैत्रिण होत्या." सुनेकडून सासूला असे उत्स्फूर्त प्रशस्तिपत्रक मिळते म्हणजे संसाराच्या परीक्षेतली पीएच्.डी. मिळवल्यासारखेच आहे.

मागच्या पिढीतल्या असूनही माईंनी स्वतः सोवळ्याओवळ्याचा फार बडिवार किंवा देवदिकांचे अवास्तव प्रस्थ कधी माजवले नाही. सकाळी-रात्री साईबाबांपुढे प्रार्थना, दुपारी ज्ञानेश्वरी-दासबोधासारख्या ग्रंथांचे थोडा वेळ वाचन, आणि रोजची देवपूजा. बस एवढेच!

त्यांनी धर्म आपल्या आचरणातून जगून दाखवला. काळाबरोबर चालण्याचा समजूतदारपणा त्यांच्याजवळ असल्याने त्याच्या घरात तीन पिढ्या खेळीमेळीने नांदल्या.

सर गेल्यावर कधीही त्या रंगीत वस्त्र नेसल्या नाहीत. पांढरे लुगडे, पांढरा पोलका आणि कपाळी देवाचा बुक्का लावलेला, अशीच त्यांची मूर्ती गेली काही वर्षे मी पहात होते. बेताच्या उंचीची, सावळ्या वर्णाची, भव्य कपाळावरील हिरव्या गोंदणावर कुंकू लावलेली, आणि सौभाग्यालंकार घातलेली, साधी केशभूषा आणि नऊवारी लुगड्या-पोलक्याची साधीच वेशभूषा केलेली, चेहऱ्यावर सदैव शांत स्मित आणि डोळ्यात तसाच वत्सलभाव असलेली त्यांची मूर्ती पूर्वी पाहिलेल्या मला, माई या पांढऱ्या पोशाखात वावरताना पाहून फार उदास उदास वाटे. मला फार नवल वाटे ते जवळजवळ नव्वदीच्या घरात येऊनही त्यांचे केस अजून पांढरे कसे झाले नाहीत याचे. मी त्यांना कधीकधीं म्हणे, "माई, पणजीबाई झालात पण केस किती छान आहेत तुमचे अजून. तरुण मुली वय कमी करून सांगतात, तशा तुम्ही वाढवून तर सांगत नाही ना? त्यावर त्या लहान मुलासारखे निरागस हसत.

स्वतःचे घर सोडून, कारणाव्यतिरिक्त त्या फारशा घराबाहेर जात नसत. स्वभावाने त्या तशा मितभाषीच होत्या. पण सर्वांच्या क्षेमकुशलाची फार अगत्याने त्या वास्तपुस्त करीत. त्यामुळे आम्हा सगळ्याना त्यांचा आधार वाटे. विश्रामबागेतल्या माझ्या 'पसायदान' बंगल्याच्या आवारात मी त्यांच्याच हस्ते दीपमाळ बसवली. आमच्या वसाहतीतल्या त्या सर्वात वडील नागरिक होत्या ना? त्यांचाही आशीर्वाद आपल्या वास्तूला असावा असे मला वाटे. प्रकृती बरी नसतानाही फार प्रेमाने त्या आल्या. माझे डोळे तेव्हा कृतज्ञतेने भरुन आले. वयोमानपरत्वे त्या हल्ली हळव्या झाल्या होत्या. आमचे प्राचार्य नरहर कुरुंदकर गेले त्याचा त्यांनाही धक्का बसला. ते इथे आले म्हणजे आर्जूवन माईंना नमस्कार करुन येत. त्यांचा विषय निघाला की माईंचे डोळे पाणवायचे आणि त्या म्हणायच्या, "फार चटका लावून गेले हो कुरुंदकर."

'९ मे' ला सकाळी त्या नेहामीप्रमाणेच उठल्या. त्यांनी फुले खुडली, सूनबाईंना हौशीने भाजी चिरुन दिली, स्नान करुन बाहेर येतात तो त्यांचा जीव कासावीस होऊ लागला. मधुकरराव-वीणाताईंनी त्यांना लगेच औषध दिले आणि त्यांना तक्क्याला टेकवून बसवले असेल नसेल तेवढ्यातच त्यांची जीवनज्योत विझली! त्यांच्या चेहऱ्यावरचा सात्त्विक भाव तसाच कायम होता. त्यांच्या पार्थिव देहाचे अंत्यदर्शन घेताना मला वाटले, मृत्यू कधीकधी इतका दयाळू आणि देखणाही असतो म्हणायचा!

गिरीश सरांच्या कवितेतले स्त्री-चित्रण अतिशय सहृयतेने केलेले आढळते, त्यांचे एक कारण माईंसारखी सहचारिणी त्यांना लाभली होती हे असावे असे मला मनापासून वाटते. सरांनी माईंची योग्यता जाणली होती म्हणूनच त्यांचा गौरव "स्नेहल स्नेहल दीपिका जीवाची" अशा यथार्थ शब्दात त्यांनी केला आहे. आणि सूनबाई सौ. वीणाताई यांनी आपल्या कवितेत "सर्वस्व दिले हो तुम्ही चांगुणेपरी" अशी कृतज्ञता त्यांच्याविषयी व्यक्त केली आहे. त्यांचे नाव 'उमा' होते पण 'गिरीशांच्या माई' हेच त्यांचे विशेषनाम वाटावे इतक्या एकात्म वृत्तीने त्या जगल्या. आपल्याबरोबर आपला पती, मुले-सुना-नातवंडे यांचेही जीवन माईंनी कृतार्थ केले. सरांनी आपल्या घराचे नाव 'कांचन' ठेवले आहे. त्या घरातले खरे कांचन म्हणजे सोने माई होत्या यात शंकाच नाही.

तीर्थस्वरुप माईंप्रमाणेच, माझ्या मनावर कोरली गेलेली आणखी एक मूर्ती आहे. ती मनोरमावहिनी फडके यांची. सुप्रसिध्द साहित्यिक प्रा. ना. सी. फडके यांच्या त्या प्रथम पत्नी. आप्पासाहेब फडके यांचा आणि शंकरभाऊंचा गाढ स्नेह असला तरी मी त्यांच्या कोल्हापूरच्या घरी तशी एकदोन वेळाच गेले आहे. पण मनोरमावहिनींच्या विवेकशीलतेचे, संयमाचे आणि क्षमाशीलतेचे जे हृदयस्पर्शी दर्शन मला एका प्रसंगाने घडले ते मात्र मी कधीही विसरणार नाही. १९४९ मधली गोष्ट आहे. माझा एकुलता एक भाऊ मुकुंद अपेंडिसायटीसच्या दुखण्याने मिरजेस हॉस्पिटलमध्ये होता. लाखामध्ये एखाद्यालाच होतात अशा अनेक गुंतागुंती त्याच्या या दुखण्यात झाल्या होत्या. स्वाभाविकच आम्ही सर्वजण फार चिंतेत होतो. एक दिवस मुकुंदला भेटयाला मनोरमावहिनी एकट्याच, कोल्हापूरहून आल्या. त्याच्याजवळ मायेने बसल्या-बोलल्या. दुपारी विश्रांतीनंतर सहज त्या 'नन्नी'"ला (माझी आई) म्हणाल्या,

"पार्वतीबाई, तुमची मालू नुकतीच एम.ए. झाल्याचं वाचलं-ऐकलं. आता लाडू कधी देता तिचे आम्हाला? मी जवळच बसले होते. विषय टाळण्याच्या हेतूने मी मजेने त्यांना म्हटले, "वैनी, अहो, उद्या मी लग्न केलं आणि थोडे दिवसांनी जर नवरा म्हणू लागला, ही हो कसली काळीबेंद्री बायको? मला बुवा थोडी सौंदर्याची भूक लागली आहे." आणि म्हणून आपली त्याने एक सुरेख छेलछबेली केली म्हणजे माझ्या संसाराचा आणि आयुष्याचा बेंडबाजाच वाजायचा की! बौध्दिक भुकेचे निमित्तही तो पुढे करील पण मी एम्.ए. असल्याने, मला लिहिता वाचता येत आहे एवढ्यावर विश्वास ठेवील तो. आणि त्या विषयाने एखादवेळी "एक्झम्प्शन" मिळेल मला. त्यावर पळभर थांबून त्या म्हणाल्या, "मालू, अगं सारेच पुरुष असे वेडे नसतात, आणि तू म्हणतेस असा काही वेडेपणा त्यानं केलाच तर आपण लक्ष नाही द्यायचं तिकडे! हे बघ, रस्त्याने जाताना लहान मूल चिखलात दगड टाकते. तेव्हा चिखलाचे घाणीचे पाणी कुणाच्या अंगावर उडते? त्याच्याच ना? पण वारंवार सांगूनही ते तोच वेडेपणा करु लागले तर गप्पच बसतो की आपण? त्यांच्या बोलण्याने मी एकदम गंभीर झाले. ज्यांना त्यांच्या कुशल कादंबरीकार पतीने ‘प्रतिभा-साधना’ हे पुस्तक अर्पण करताना "माझ्या जीविताची पवित्र प्रतिभा सौ. मनोरमा हीस प्रीतिपूर्वक-" असे म्हट्ले होते आणि नंतर आपल्या विद्यार्थिनीशी प्रेमविवाह करुन- (द्वितीय विवाह करुन-) आपल्या कर्तव्यपरायण, सोज्वळ, निरपराध पत्नीचा अवमान केला होता. सौभाग्यपणी वैधव्याच्या वेदना जिला भोगायला होत्या, ती, ती क्षमाशील पत्नी इतक्या शांतपणे मला हा उपदेश करीत होती. मी वहिनींना मनोमन नमस्कार केला आणि म्हटले, "वहिनी, धन्य आहे तुमची!"

आप्पासाहेबांप्रमाणेच ती. भाऊसाहेब खांडेकर हेही मराठी सारस्वताचे थोर मानकरी. त्यांचे आमचे दूरचे असे थोडे नातेही लागते. आमच्या आनंदीकाकीं (डॉ. भडकमकरांच्या कन्या) चे ते मावसकाका लागतात. भाऊंचा स्वभाव फार मायाळू. त्यामुळे कोल्हापूरला पुष्कळदा मी त्यांच्याच घरी उतरत असे. स्वाभाविकच सौ. उषाताईचाही सहवास घडे. त्या अत्यंत सुस्वरुप, उंच, गोऱ्या, सुरेख बांध्याच्या होत्या. त्यांचे डोळे तेजस्वी आणि नाक तरतरीत होते, चेहरा घवघवीत होता. आपल्या केसांचा मोठा छान आंबाडा त्या घालीत. अतिशय व्यवस्थितच चापूनचोपून नेसलेले नऊवारी लुगडे आणि त्यावर उत्तम शिलाईचा पोलका असे. कपड्यांची निवड त्या फार साक्षेपीपणाने करीत. रंग, डिझाईन सारे असे असायचे की त्यांच्या सौंदर्याची खुलावट होई. स्वच्छता, टापटीप, सौदर्य यांचे त्याना वेडच होते जणू. रात्री झोपून सकाळी उठल्यावर त्यांचा एक केस इकडचा तिकडे कधी व्हायचा नाही. कोठीतल्या जुन्या कपाटापासून शेल्फावरच्या स्टील, पितळेच्या लहानमोठ्या भांड्यांपर्यंत सगळ्या वस्तू जणू काल परवाच घेतल्या आहेत असे वाटावे अशा चकचकीत, लखलखीत असायच्या. तीच गोष्ट कपड्यांची ! कपाटात, ट्रंकेत, चुरगळलेला, मळलेला कपडा सापडणेच अशक्य! सर्व कपडे घडी घातलेले नि इस्त्री केल्यासारखे. सौ. वीणाताई कानेटकर सांगतात, "शिरोड्याच्या घरात वाळवीचा त्रास असे तर नारळाच्या करवंट्या व्यवस्थित घासून त्याला सुंदर आकार देऊन, ट्रंकेच्या चारी बाजूंना ठेवून त्यावर दुसरी, त्यावर तिसरी अशा ठेवलेल्या असत. मातीने सारवलेली आणि पेटत्या निखाऱ्याने सुरेख लाललाल झालेली त्यांची शेगडीदेखील बघत रहावे अशी असायची, फोडणी करताना काय बिशाद आहे तेला हळदीचा डाग शेगडीला पडेल की मोहरीचा दाणा बाहेर उडेल? साधी भाजी आणायची असली तरी त्यांच्या हातातली पिशवी-तिच्यावर निदान काही विणलेले तरी असायचेच अशी असे.

पाकशास्त्रात त्या ‘फर्स्ट क्लास वुईथ डिस्टिक्शन’ पास होत्या. वड्या केल्या तर त्या अशा कापत की एक वडी खाल्ल्यावर बशीतले वड्यांचे डिझाईन बिघडू नये म्हणून आणखी खाण्याचा मोह व्हावा. लाडू केले तरी सगळे एका घाटाचे! कुणी वेडेवाकडे पाय पसरुन खात बसलेलेही त्यांच्या सौंदर्यदृष्टीला खपायचे नाही! मी पुषकळदा त्यांच्याशी स्वयंपाकघरातच गप्पा करीत बसायची. मग मी त्यांना विचारी, "मी अशी फतकल मारुन मध्येच बसले आहे त्यामुळे तुमचे स्वयंपाकघर जर कसेतरीच दिसतंय. म्हणून मला उचलून तुम्ही तुमच्या कपड्याच्या कपाटात टाकून देणार नाही ना?" त्यावर त्या मनमोकळेपणाने हसत.

भाऊ कुठेही असोत, शिरोड्याला, पुण्याला की कोल्हापूरला त्यांच्याकडे नानाविध क्षेत्रांतील माणसे सतत येत असायची. शाळेच्या पुस्तकात भाऊंचा धडा आहे म्हणून त्यांना पहायला आलेल्या विद्यार्थ्यापासून तामीळ-हिंदी भाषांत भाषांतरित झालेल्या त्यांच्या

कादंबऱ्या वाचणाऱ्या वाचकांपर्यंत सगळ्यांचा त्यात समावेशा असे. भाऊंची वाक्‌गंगा अखंड वाहत असायची आणि ऐकणारा तृप्त होऊन जायचा.

भाऊंप्रमाणेच उषाताईंनीही येणाऱ्याजाणाऱ्यांचे सदैव हसतमुखाने स्वागत केले. माझ्यासारखे एखादे सामान्य माणूस घरी जरी त्यांच्या घरी गेले तरी त्याचीदेखील आवड नावड लक्षात ठेवून त्या स्वयंपाक करीत. मग भाऊंचे पथ्यपाणी निगुतीने सांभाळले यात काय नवल ?

त्या स्वतः नेहमी उद्योगात गर्क असायच्या. आणि इतरांनीही तसे असावे अशी त्यांची अपेक्षा असायची उषाताईंच्या या सगळ्या अपेक्षांत आमचे आजकालचे नोकर कसे बसणार? स्वाभाविकच कामाला येणाऱ्या नोकरबाया थोडे दिवस काम करीत आणि मग परांगदा होत पण उषाताई त्याची पर्वा करीत नसत. कोणत्याही कामाला त्या पदर बांधून तयार असत. मला अनेकदा वाटते संसारातली प्रत्येक बारीक सारीक गोष्ट इतकी लक्ष घालून सदैव सुंदर ठेवण्याच्या त्यांच्या स्वभावामुळेच रक्तदाबाचा विकार बळावला असावा.

त्यांच्या स्वभावातल्या आणखी एका गोष्टीचा मला आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. तो त्यांचा गुण म्हणजे प्राप्त परिस्थितीत कुरकुर न करता जगणे हा. शिरोड्यासारख्या कोकणातल्या एका खेड्यात  ज्या समाधानाने त्या जगल्या, भाऊंप्रमाणेच तिथल्या खडतर जीवनाचे चटकेही तक्रार न करता त्यांनी जसे सोसले, त्याच प्रसन्न वृत्तीने, जीवनात सर्व वैभव प्राप्त झाल्यावर, भाऊंना उत्तमोत्तम सन्मान प्राप्त झाल्यावरही त्या राहिल्या. गर्वाने कधी फुगल्या नाहीत की कुणाची अवहेलनाही त्यांनी केली नाही.

एक मात्र मला वाटते की या त्यांच्या टापटिपीच्या वेडापायी त्यांना भाऊंच्या कथाकादंबऱ्या तरी वाचायला कधी वेळ झाला असेल की नाही ? कोण जाणे!

त्यांच्या सर्व दुखण्यात भाऊ व त्यांच्या मुली यांनी त्यांची खूप सेवा केली. भाऊ जात्याच कोमल मनाचे, प्रेमळ व जातिवंत प्रतिभावंत. उषाताईंचे जाणे त्यांच्या मनाला फार खोलवर जाणवले असणार! त्या गेल्यावर भाऊंनी पत्रात लिहिले होते. "मालूताई, माझ्या घरचा नंदादीप विझला."

आता ओळख करुन घ्यायची आहे आमच्या ज्योत्स्नाताईंची ! म्हणजे नामवंत समीक्षक व कवी प्रा. रा.श्री. जोग यांच्या पत्नीची. मी तिचा उल्लेख एकेरी नावाने करते आहे कारण प्रारंभी ती गुरुपत्नी म्हणून माझ्या जीवनात आली तरी पुढे लवकरच ती माझी जिव्हाळ्याची, मार्गदर्शक मैत्रीण झाली. ती वर्णाने लख्ख गोरी, घाऱ्याघाऱ्या डोळ्यांची, अटकर बांध्याची आहे. आणि आज सत्तरी ओलांडून गेल्यावरही तिच्या केसांचा पिंगटापणा खूप कायम आहे. तिच्या रंगामुळे आणि स्वभावामुळे तिला 'ज्योत्स्ना' हे नाव शोभूनच दिसते. या ज्योत्स्नेमुळे दादांमधला 'निशिगंध' (हे दादांचे कविता लेखनासाठी घेतलेले टोपण नाव होते.) छान फुलला-खुलला. दादांनी आपले 'चर्वण' पुस्तक ज्योत्स्नाताईना अर्पण केले आहे.  त्या अर्पणपत्रिकेत शब्द फक्त चार आहेत. "सहधर्मचारिणी सौ. ज्योत्स्ना हीस' पण हे शब्द अत्यंत मार्मिक आणि यथार्थ आहेत. खरेच त्या दोघांच्या स्वभावातील अनेक 'धर्म' समानच आहेत. 'ज्योत्स्नास' या शब्दापुढे त्यांनी ओढलेली (हायफन)- आडवी रेघ त्या उभयतामधला कोमल प्रीतीभाव सूचकतेने सांगून जाते. दोघांचेही बोलणे मोजके आणि अनेकदा मिस्किल असे असायचे. दोघांनाही वाचनाचे वेड! दादा तर विद्वान प्राध्यापकच होते पण ज्योत्स्नाबाई देखील घरातल्या वाचनालयातली, दादांकडे अभिप्राय, रसग्रहण यासाठी येणाऱ्या पुस्तकांतली निवडक पुस्तके काढून रात्री जागरण करुन पण वाचल्याशिवाय राहात नसे. तिचे वाचन रसज्ञ आणि डोळस वृत्तीने केलेले असते याचा प्रत्यय त्या पुस्तकाविषयी ती जे बोलणे सांगते त्यावरुन येतो. विवाहानंतर ती कर्वे विद्यापीठाची मॅट्रिक झाली. उत्तम गुणाने. तिची विलक्षण तीव्र स्मरणशक्ती पाहिली म्हणजे मला वाटाते ही पुढे शिकली असती तर दादांप्रमाणेच हीही एखाद्या महाविद्यालयात सहज

प्राध्यापिका होऊन गेली असती. पंचवीस तीस वर्षापूर्वी वाचलेल्या कथा-कादंबऱ्यातील पात्रे प्रसंग ती अगदी न चुकता आजसुध्दा सांगते. गणित विषय तिचा चांगला पक्का आहे. लहानपणी चित्रा-रोहिणी, काळकाम वेगाचे ‘फुटक्या हौदाचे’ गणित विचारीत. किंवा तेवीसाचा नाही तर एकोणतीसचा आड्मुठा पाढा विचारीत ही पट्दिशी सांगून मोकळी व्हायची! कष्टांचा तर हिला कधी कंटाळाच नाही. दादांना आवडतात म्हणून भल्या पहाटे उठून पोह्याच्या पापडाचे पीठ ही जात्यावर दळायची. धुणे तर आजही ती नोकरबाईकडे टाकीत नाही. दादांनाही बागकामाची, भिंतीला स्वतः रंग द्यायची हौस होती. दोघांची पत्रे अत्यंत मुद्देसूद असायची. फापटपसाऱ्याला तिथे वाव नसायचा. अक्षर दोघांचेही अगदी सुरेख! गोल वळणदार. ज्योत्स्नाताई शुध्द्लेखनातही तरबेज आहे. दादांसारखीच. मी दादांना चिडवून म्हणे, "ज्योत्स्नाताईंचे शुध्द्लेखन चांगले आहे म्हणून बरं झालं ग बाई. नाहीतर तिने पाठविलेले प्रेमपत्रदेखील, त्यातल्या अशुध्द लेखनाच्या चुका दुरुस्त करुन, त्या समासात तांबड्या पेन्सिलीने दाखवून, पुढे तिरकी उभी रेघ काढून, तुम्ही तिच्याकडे पत्र परत पाठविले असतेत! सुटली बिचारी त्यातून, त्यावर ते गालातल्या गालात हसत. पत्र असो की बोलणे असो दोघांचीही भावनाविष्काराची पध्दत अतिशय संयत आणि मर्यादशील. ‘डिटॅचमेंट ऑफ रेटिना’ या डोळ्याच्या विकाराने दादा आजारी असतानाची गोष्ट. डॉक्टरांना डोळे दाखवून रात्रीच्या गाडीने दादा मुंबईहून आले. डॉक्टरांचे मत जाणण्याची सर्वांनाच उत्सुकता होती. पण विचारणे अवघडही वाटत होते. शेवटी ज्योत्स्नाताईच म्हणाली, "काय सांगितले डॉक्टरांनी?" बॅगेतले धोतर काढून निऱ्या करीत करीत दादांनी उत्तर दिले, "तो डोळा गेल्यातच जमा आहे म्हणाले" तिचे डोळे एकदम भरुन आले पण ते इतरांना दिसू नयेत म्हणून ती एकदम बाहेरच्या व्हरांड्यात गेली. ती स्वभावाने फार हळवी आहे. तिच्या डोळ्यांना एरवीही पाणी लवकर येते. पण तुम्ही कितीही वेळा आर्जवून तिला विचारा, ती आपल्याला त्याचे कारण सहसा सांगणार नाही. आपले दुःख इतरांना सांगून त्यांना कशाला त्रास द्यायचा? अशी तिची भावना. मला ते पटले नाही आणि म्हणून मी त्या दोघांशीही या मुद्यावर भरपूर वादही घाली. दादा तर असे की मुक्या प्राण्यांचे हाल पाहवत नाहीत म्हणून ते सर्कस पहायला यायला देखील तयार नसायचे.

आपल्या प्रापंचिक कामांच्या व्यापातून सवड मिळाली की दादाबरोबर हौशीने ही फिरायला जाई. जाता येता त्यांच्या ओळखीच्या वा आप्तांपैकी कोणाच्या घराचे बांधकाम चालू असले तर आत जाऊन आवडीने ही दोघे पाहणार. ज्योत्स्नाताईची बुध्दी सूक्ष्म व तल्लख आहे. मी माझी चिमुकली बंगली अलीकडेच विश्रामबागेत बांधली त्यावेळी त्या बांधकामात मी कुठे कुठे जातीने लक्ष द्यावे आणि काय काय सोयी करुन घ्याव्या याबद्दल तिने कितीतरी उपयुक्त सूचना केल्या. मला वाटाते भारताचा, बहुतेक प्रदेश तिचा पाहून झाला आहे. चित्राकडे अमेरिलेलाही ती दोघे जाऊन आली. दादांचा देवाधर्मावर आणि कर्मकांडावर विश्वास नसला तरी त्यांचे वडील तीर्थरुप बापू वृत्तीने व मनाने धार्मिक होते. त्यांच्या देवपूजेची तयारी करणे, त्यांना सोवळ्याने स्वयंपाक करुन जेवायला वाढणे यात ती कधी चुकली नाही पण स्वतः ती मुद्दाम एखादा उपास करते आहे. देवाला गेली आहे किंवा पोथ्या-पुराणात गुंतली आहे असे मी चाळीस वर्षात कधी पाहिले नाही. तिला स्वतःला गाणे म्हणताना मी ऐकलेले नाही पण दुपारी किंवा रात्री जेवण झाल्यावर बाहेरच्या हॉलमध्ये दादा रेडिओ लावून गाणे ऐकत बसले असले म्हणजे स्वयंपाक घरातले काम आवरता आवरता, "अगबाई, माणिक वर्मा गाताहेत वाटते? असे म्हणताना आणि कधीकधी त्या गाण्याचा रागही अचूक सांगताना मी तिला पाहिले आहे. कुठल्याही गोष्टीत चेंगटपणा करीत बसणे आणि फुकट वेळ घालवणे तिला एकदम नामंजूर. बायकांना साड्या खरेदीला भारी वेळ लागतो अशी बहुधा सगळ्या पुरुषांची तक्रार असते. पण ज्योत्स्नाताई त्याला सुखद अपवाद ठरेल. तिची विचार करण्याची पद्धत अशी- आपल्याला दोन नऊवारी लुगडी घ्यायची आहेत, या दोन तीन रंगांपैकी साधारण इतक्या किंमतीपर्यंतची ठीक- मग ती दुकानात गेली की तसे त्या दुकानदाराला सांगणार आणि झटपट काम उरकून घरी परत येणार. दादांप्रमाणेच तिलाही शांत रंगांची आवड आहे. कपडा असो की माणूस असो त्याचा भडकपणा आणि भपका दोघांनाही रुचायचा नाही. तिचा पोषाख म्हणजे मंद निळे, गुलाबी किंवा अशाच एखाद्या सौम्य रंगछटेचे नऊवारी लुगडे व त्यावर, घरात असताना बहुधा चोळी आणि बाहेर जाताना पोलके असा. अलीकडे तिला थंडी तेवढीशी सोसत नाही म्हणून हातविणीचे, क्रोशाचे जाकीट ती वरती घालते. गोरी असल्याने कुठलाही रंग तिला शोभून दिसतो. दागिन्याबिगिन्यांचा सोस तर तिला मुळीच नाही आणि वस्तू टिकविण्यात तर तिचा हात धरणे कठिण! कधी तरी

मला ती सांगत होती, 'या कुड्या ना, मी सांगलीला असताना घेतल्या होत्या." त्याला आता चाळीसांवर वर्षे तर उलटून गेलीच. तिच्या समाधानी वृत्तीबद्दल दादा म्हणत, "कपडे, दागिने कशाबद्दलही माझ्याकडे त्यांनी कधी हट्ट केला नाही. वाढदिवसाला काय आणू म्हणून विचारले तर "मला काय कमी आहे? सगळं आहेच की! असे या उत्तर देतात."

स्वयंपाकात ती उत्तम सुगरण आहेच पण तिचे सगळे काम झटपट आणि कसली धांदल, रागवारागवी न करता चालते. इतक्या वर्षात "कंट्टाळा आला बाई मला" हे शब्द काही मी तिच्या तोंडून ऐकले नाहीत.

दादा ज्योत्स्नाताईंचे परस्परांशी होणारे वागणे-बोलणे पाहणे, ऐकणे, हा एक सुखद अनुभव असे. कधी दोघे मिळून गाजलेल्या एखाद्या इंग्रजी चित्रपटाला जात, तर कधीकधी रात्री एखादे इंग्रजी-मराठी छानदार पुस्तक मोठ्याने एकमेकांना वाचून दाखवीत, भोजनानंतरची दुपारी पंधरावीस मिनिटांची वामकुक्षी आटोपली की ज्योत्स्नाताई कोठी खोलीतल्या हातमशीनवर काही ना काही शिवत बसायची. दादांचे उन्हाळी मलमलीचे सदरे तीच शिवत असे. दादा केव्हा केव्हा तिथे जाऊन बसत आणि कौतुकावे म्हणत. "मला या मशीनचा फार हेवा वाटातो बुवा!! आमच्यापेक्षा त्यालाच 'यांचा' सहवास जास्त मिळतो!! एकदा तर दादांनी गंमतच केली. वर्षभर, दर महिन्याला ज्योत्स्नाबाईंना एक लुगडे स्वतः दुकानांत जाऊन ते घेऊन आले. त्यावर त्या दोघांनाही मी आहेऽऽबुवा" म्हणून खूप चिडवले. त्यावेळी लाजून लाजून ज्योत्स्नाबाईंची पुरेवाट झाली. त्यांच्या लग्नाला पन्नास वर्षे पुरी झाली त्यावेळची एक आठवण सांगते. दादांना भेटायला त्यांचे खूप जुने असे कोणी प्रौढ विद्यार्थी आले होते. त्यांच्या कपात चहा ओतताना हातातल्या गुलाबी रंगाच्या, पांढऱ्या फुलांच्या किटलीकडे बोट दाखवीत दादा त्यांना सांगत होते. "ही किटली आमच्या लग्नातली आहे बरं का." त्यांचा त्यावेळचा प्रसन्न चेहरा आजही माझ्या डोळ्यासमोर उभा आहे. एकदा मी दादांना म्हटले, "आपली ज्योत्स्नाताई छान गोरी आणि तुम्ही असे काळे सावळे, मग तिने कसे काय तुम्हाला पसंत केले हो? त्यावर तेवढ्याच खट्याळपणे त्यांनी उत्तर दिले "मलासुध्दा त्याचे नवलच वाटतंय्" अशा अनेक प्रसंगांतून त्यांच्या परस्परांवरील प्रीतीचे जे हृद्य दर्शन होई ते पाहिले की 'आनंदाच्या डोही आनंद तरंग' म्हणजे काय याचा अर्थ मला चांगला समजे.

दादांच्या विद्वत्तेचा, लौकिकाचा-चारित्र्याचा ज्योत्स्नाताईला स्वाभाविकच अभिमान-आनंद वाटे. पण "अशा विद्वानाची मी बायको" असला भाव तिच्या वागण्यात कधी डोकावला नाही. उलट काही कारण नसताना, शंभर टक्के अनाठायी असा एक न्यूनगंडच ती आपल्या मनात बाळगत असे. तो म्हणजे आपण ना आपल्या पतीसारख्या विद्वान, लेखक किंवा पदवीधर! तो ती क्वचित बोलून दाखवी पण दादांना किंवा आम्हा मैत्रिणींना किंवा तिच्या मुलांना तो कधीच जरासुध्दा पटला नाही. जे सत्य नाही ते पटेल कसे ?

दादा डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य, संस्थेत अधिकारपदावर पण त्यांच्या अधिकाराचा तिने कधी दुरुपयोग केला नाही. कॉलेजचा गडी तिच्या घरी कधी खाजगी कामासाठी तिने राबवला नाही की संस्थेच्या वा दादांच्या कामात कधी नाकही खुपसले नाही.

आपल्या मुलांशी तिचे व दादांचे वागणे पहिल्यापासून स्नेहाचे व जिव्हाळ्याचे असायचे. त्यामुळे आई-दादा म्हणजे त्यांचे विश्वासाचे व आदराचे स्थान आहे. आता ती थकू लागली आहे. गुडघेदुखीची तक्रार चालू झाली आहे, तरीही स्वस्थ बसणे हिला मंजूर नाही. अजून स्वयंपाक स्वतःच करते. अशोक रोहिणीने किती वेळा बजावले तरी 'औषध कशाला?' असे म्हणून ते घ्यायचे टाळते. घेतलेनच तर होमिओपथीचे नाहीतर आयुर्वेदाचे घेते. (हाही पतिपत्नींचा एक 'कॉमन फॅक्टर!')

आता दादा नाहीत. फुलांचा सुगंधच उडून गेल्यासारखे तिला वाटते आहे. ते खरेच आहे. मुले मायाळू आहेत ती आईसाठी जीव टाकतात. प्रा. डी. डी. वाडेकरांसारखे दादांचे जिव्हाळ्याचे स्नेही पुण्यात आले की अगत्याने घरी येऊन ज्योत्स्नाताईंची विचारपूस करतात. रोहिणी भाटे पुरुपौर्णिमेला येऊन न चुकता तिला नमस्कार करुन फुले देऊन जाते, अशा प्रसंगी दादांच्या आठवणी

निघतात, भूतकाळ सजीव होऊन बोलू लागतो आत्ता तिच्या केसात रुपेरीपण येऊ लागले आहे. तिचा कुंकुमतिलक विरहित भालप्रदेश, चेहऱ्यावर वार्धक्य उमटवू लागलेल्या काही खुणा, आणि ती बोलत नसली तरीही दादा नसल्याने तिला जाणवणारे एकाकीपण या साऱ्यांमुळे मला ती एखाद्या योगिनीसारखी दिसते आणि माझे मन गलबलून जाते.

या तृप्त, समाधानी, सुसंस्कृत घराने, ज्योत्स्नाताई-दादा-बापू-मुले या सर्वांनी, मला जीवनात उदंड उदंड माया दिली आहे. माझ्यासाठी फार खस्ता खाल्या आहेत, मला परोपरीने संभाळून घेऊन वाढवले आहे. त्यांचे ऋण मी कसे विसरेन?

ही शब्दचित्रे लिहीत असताना आमच्या प्रभावतीबाई कुरुंदकराचीही मला तीव्रतेने आठवण आली. कुशाग्रबुध्दीचे त्यांचे पती प्राचार्य नरहर कुरुंदकर यांनी तीन एक वर्षापूर्वीच्या 'ललित'च्या दिवाळी अंकात प्रभावतीबाईचे सुरेख शब्द चित्र रेखाटले आहे. त्यापेक्षा अधिक मी काय लिहिणार? पण तरीही त्यांच्याविषयी थोडे लिहावेसे वाटतेच आहे. प्राचार्यांच्या निधनानंतरची एक घटना सांगते-

नरहर कुरुंदकरांची असामान्य बुध्दी, त्यांचा खेळकर स्वभाव, सहवासात येणाऱ्या कोणाही दु:खिताचे दु:ख कमी करण्यासाठी जिवापाड झटण्याची त्यांची कळकळ अशा किती तरी गुणांनी त्यांनी हजारो माणसे जोडली होती. केवळ मराठवाड्यानेच नव्हे तर उभ्या महाराष्ट्राने त्यांच्यावर उदंड प्रेम केले. त्यांच्या अकाली झालेल्या मृत्यूने सर्वांनाच मोठा धक्का बसला. त्या धक्क्यातून थोडे सावरल्यावर मराठवाड्यातल्या त्यांच्याच चाहत्यांनी बरीच मोठी रक्कम जमवून ती श्रीमती प्रभावतीबाई व मुले यांना देण्याचा मनोदय जाहीर केला. रक्कम जमविण्याबाबत त्यांनी जनतेला आवाहन केले. हे प्रभावतीबाईंना कळल्यावर त्यांनी वर्तमानपत्राकडे निवेदन प्रसिध्दीस दिले. त्याचा आशय असा "माझ्या पतीने मला व माझ्या मुलाबाळांना आयुष्यात कशाला कमी केले नाही. आमच्या आयुष्यभराच्या मीठभाकरीचीही व्यवस्था त्यांनी केली आहे. म्हणून आमच्यासाठी आपण अशी काही रक्कम जमवू नये. ती मी घेणार नाही. माझ्या दिवंगत पतीलाही ते कधीच आवडणार नाही. आजवर समाजाने त्यांच्यावर जे प्रेम केले त्याबद्दल आम्ही कुटुंबीय सर्वांचे ऋणी आहोत. हाच लोभ सदैव असू द्यावा एवढीच विनंती." प्रभावतीबाईच्या या नि:स्पृहपणाचे आणि बाणेदारपणाचे मला फार कौतुक वाटले आणि मग कुरुंदकरांनी आणि त्याच्या आप्तांनी प्रभावतीबाईबद्दल सांगितलेल्या कितीतरी गोष्टी आठवल्या. कुरुंदकर नुसते कोणीच नव्हते असे नाही तर बेकार होते. त्यांचे शिक्षणही पुरे झाले नव्हते अशावेळी त्यांच्यातील बुध्दी व कर्तृत्व याचे लपलेले तेज अचूक ओळखून, त्यांच्यावर विश्वास टाकून प्रभावतीबाईंनी त्यांच्याशी विवाह करण्यास त्यांना दिलेला होकार, गरिबीच्या संसारात अतोनात कष्ट उपसत असतानाही ठेवलेली प्रसन्न वृत्ती, दिवाळी व उन्हाळा या दोन्ही सुट्ट्यांत कित्येक वर्षे न चुकता कुरुंदकर व्याख्यानांच्या व इतर सामाजिक दौऱ्यावर जात, त्यावेळी एकटीच्या जबाबदारीवर घर संभाळण्यात दाखवलेला धीटपणा, अखंड माणसांच्या लोंढ्यात वावरणाऱ्या पतीला, न कुरकुरता दिलेली साथ, पतीचे ब्लँकेट प्रवासात गहाळ झाले म्हणून आपणही तो परत येईपर्यंत पांघरुण न घेता झोपण्यात त्यांनी व्यक्त केलेली प्रेमोत्कटता आणि सतत कार्यमग्न असणाऱ्या आपल्या जोडीदाराला दुपारी घडीभराची तरी विश्रांती मिळावी म्हणून दरवाजात बसून केलेला पहारा व त्याचवेळी कोणी मंत्री भेटायला आले असता. "ते झोपले आहेत. मी त्यांची झोपमोड करणार नाही. पंधरा मिनिटांनी 'ते' उठतील आपण तेव्हा या." असे सांगण्याचा निर्णय सरळपणा - आणि अशाच कितीतरी आठवणी!!

मला तीव्रतेने वाटले १० फेब्रुवारीला स्वत:ला बरे नसताही संगीत समारोहाच्या उद्‌घाटनासाठी कुरुंदकर औरंगाबादला जायला निघाले तेव्हा प्रभावतीबाई कळवळून त्यांना सांगत होत्या. "बरं नाही तुम्हाला, तुम्ही जाऊ नका हो आज." त्या विनंतीला मानून कुरुंदकरांनी जाणे रहित केले असते तर-? कोण जाणे नियतीने त्या सध्यांकाळीच त्यांच्यावर टाकलेला निर्दय मृत्यूचा पाश टळलाही असता!! आणि त्यांच्या जाण्याने "माझ्या जीवनात आता कायमचाच अंधार झालाय" असे मन पिळवटून टाकणारे शब्द म्हणायचाच प्रसंग आमच्या प्रभावतीबाईंवर आला नसता. पण ते व्हायचे नव्हते हेच खरे !

प्रभावतीबाईंवरुन एकदम आठवण झाली थोर कवयित्री श्रीमती इंदिराबाई संतांची! अकाली दिवंगत झालेल्या आपल्या साहित्यिक पतीला आपल्या आर्त व कोमल भावकवितेतून त्यांनी अमर केले आहे. इंदिराबाई म्हणजे शालीन, सुसंस्कृत, विनीत व्यक्तिमत्त्वाचे चालते बोलते उदाहरण!

असेच एक अविस्मरणीय व्यक्तिमत्व म्हणजे तीर्थस्वरुप सौ. मालतीबाई बेडेकर या तेजस्विनीचे ! स्त्री जातीची परोपरीची दुःखे निर्धाराने आणि निर्भयपणे समाजापुढे मांडणाऱ्या, त्यासाठी आयुष्यभर आपली लेखणी झिजविणाऱ्या या आमच्या 'ताई' हिंगण्याच्या शाळेत त्या आमच्या मुख्याध्यापिका होत्या. विलक्षण 'स्मार्ट' आणि फार सुंदर शिकविणाऱ्या म्हणून विद्यार्थिनींची त्यांच्यावर मनोमन भक्ती होती. विवाहानंतर लगेचच त्याचे पती विश्राम बेडेकर परदेशी गेले. वर्षभराने ते परतले. पण त्याच्या मनात जणू कसले तरी दुःख साकळले आहे हे ओळखून त्या म्हणाल्या, "बेडेकर, तुमच्या मनात काय चालेले आहे त्याला शब्दरुप का देत नाही तुम्ही? ते दुःख होते दुसऱ्या महायुध्दाचे. माणुसकीची राख झालेली बेडेकरांनी जी डोळ्यांनी पाहिली होती त्याचे! त्यानंतर थोड्या दिवसातच 'रणांगण' ही अ-पूर्व सुंदर कादंबरी या श्रेष्ठ आणि तरल व विलक्षण कलावंताच्या कसबी लेखणीतून जन्माला आली. जातिवंत प्रतिभावंतालाच जातिवंत प्रतिभावंताचे मन कळते ते असे! अशा थोर स्त्रिया जीवनात मला पहायला मिळाल्या हे मी खरोखरीच माझे भाग्य समजते.

साहित्यिकांचा गौरव समाज तोंड भरुन करतो. पण "प्रत्येक कर्तृत्ववान पुरुषाच्या पाठीशी एक स्त्री उभी असते" अशा अर्थाच्या इंग्रजी सुभाषिताची आठवण समाजाला नेहमी असतेच असे नाही. या साहित्यिकांना आयुष्यभर 'सांभाळायचे' काम त्यांच्यातला प्रतिभावंत निरामय व हसता फुलता रहावा म्हणून आपल्या जवळच्या अनेक शक्तींचे समर्पण करायचे, हे काय लहानसहान काम आहे? त्यांचाही यथोचित गौरव करुन त्यांच्याबद्दलची कृतज्ञता आपण प्रकट करायला नको का? त्यासाठी तर या लेखाचा हा सारा प्रपंच केला.